# 1. Ganpatichi  Aarti

## गणपतीची आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची ।।1।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।।धृO।।
रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।
हिरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रूणझुणती नुपुरे चरणी घागरिया ।। जय ।।२ ।।
लंबोदर पीतांबर फणी वरवंदना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना ।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।। दर्शनO।।३।।

## 2. Shri Shankarachi Aarti

लवधवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ।
तेथुनियां जल निर्मळ वाहे झुळझूळां ॥१॥

जय देव जय देव जय श्रीशंकरा ।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥धृ॥

कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा ।
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥जय॥२॥

देवीं दैत्यीं सागरमंथन पैअं केलें ।
त्यामाजीं जें अवचित हळाहळ उठिलें ॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥जय॥३॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी ।
रघुकुलतिलक रामदासा अंतरीं ॥जय॥४॥

## 3. Durga Devichi Aarti

### श्री देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी।
अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी।
वारी वारी जन्म मरणांते वारी।
हारी पडलो आता संकट निवारी ॥१॥
जय देवी जय देवी महिषा सुरमथिनी।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी ॥धृ॥
तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही।
साही श्रमले परंतु न बोलवे काही।
साही विवाद करिता पडले प्रवाही।
ते तू भक्तालागी पावसी लवलाही ॥२॥
प्रसन्न वदने प्रसन्न होती निजदासा।
क्लेशांपासूनी सोडवी तोडी भवपाशा।
अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥३॥

# 4. Shri Vitthalachi Aarti

## विठोबाची आरती

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ।
चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ॥१॥
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥जय०॥धृ॥
तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं।
कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं।
देव सुरवर नित्य येती भेटी।
गरुड हनुमंत पुढें उभे राहती॥जय० ॥२॥
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा।
सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां।
राही रखुमाबाई राणीया सकळा।
ओंवाळीती राजा विठोबा सांवळा॥ जय० ॥३॥
ओंवाळूं आरत्या कुरवंडया येती।
चन्द्रभागेमाजी सोडुनियां देती।
दिंडया पताका वैष्णव नाचती।
पंढरीचा महिमा वर्णावा किती॥ जय०॥४॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
चन्द्रभागेमाजीं स्नानें जे करिती ।
दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती।
केशवासी नामदेव भावें ओंवाळिती॥५॥

INDIF.COM

# 5. Shri Dattachi Aarti

## ।। श्रीदत्ताची आरती ।।

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेती नेति शब्द न ये अनुमाना। सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना।।१।।
जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता। आरती ओवाळीतां हरली भवचिंता ।।धृ०।।
सबाह्या अभ्यंतरीं तूं एक दत्त। अभाग्यासी कैंची न कळे ही मात।
पराही परतली तेथें कैचा हेत। जन्ममरणाचा पुरलासे अन्त।। जय०।।२।।
दत्त येउनियां उभा ठाकला। साष्टांगें नमुनी प्रणिपात केला।
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला। जन्ममरणाचा फेरा चुकविला।। जय०।।३।।
दत्त दत्त एसीं लागलें ध्यान। हरपलें मन झालें उन्मन।
मींतूपणाची झाली बोळवण। एका जनार्दनीं श्रीदत्त जाण ।।४।।
जय देव जय देव जय० ।।

## 6. Ghalin Lotangan - Prarthana

घालीन लोटांगण, वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ।
प्रेमें आलिंगन, आनंदे पूजिन ।
भावें ओवाळीन म्हणे नामा ।।१।।
त्वमेव माता च पिता त्वमेव।
त्वमेव बंधुक्ष्च सखा त्वमेव ।
त्वमेव विध्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव।।२।।
कायेन वाचा मनसेंद्रीयेव्रा |
बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात ।
करोमि यध्य्त सकलं परस्मे |
नारायणायेति समर्पयामि ।।३।।
अच्युतं केशवं रामनारायणं |
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं |
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।४।।
हरे राम हर राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।

## 7. Mantra Pushpanjali

# मंत्र पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तनि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा: ॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मस कामान् कामकामाय मह्यं।
कामेश्र्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नम: ।
ॐ स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं
वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायी स्यात् सार्वभैम:
सार्वायुष आं तादापरार्धात् ॥
पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति
तदप्येष: श्लोको भिगीतो मरूत:
परिवेष्टारो मरूतस्यावसन् गृहे ॥
आविक्षितस्य कामप्रेर्विश्र्वेदेवा: सभासद इति ॥

॥ गणपतिबाप्पा मोरया । श्री मंगलमूर्ति मोरया ॥